**-: प्रेसनोट दिनांक - ०२/०४/२०२४ :-**

**आरोपी लोकसेविका रेखा भैरू लोहार, वय - ३९ वर्षे, पोलीस हेड कॉन्स्टेबल, नेमणुक-गडहिंग्लज पोलीस ठाणे, जि. कोल्हापूर, रा. हरळी रोड, लक्ष्मीनगर जवळ, मुक्काम पोस्ट भडगांव, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर यांनी लाच मागणी करून ती स्विकारलेबाबत........**

---

तक्रारदार व त्यांच्या पत्नी यांचेवर गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे डिसेंबर २०२३ मध्ये मालमत्तेचे नुकसान केलेबाबत गुन्हा दाखल आहे. सदर गुन्हयाचा तपास मपोहेकॉ/ लोहार यांचेकडे आहे. सदर गुन्हयामध्ये तक्रारदार व त्यांच्या पत्नी यांचेविरूध्द प्रतिबंधक कारवाई न करणेकरीता मपोहेकॉ/ लोहार यांनी तक्रारदार यांचेकडे २,०००/-रू मागणी केली.

तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर येथे दिलेल्या तक्रार अर्जाप्रमाणे पडताळणी केली असता पडताळणीमध्ये आलोसे मपोहेकॉ/लोहार यांनी तक्रारदार व त्यांच्या पत्नी यांचेवर दाखल असलेल्या गुन्हयामध्ये प्रतिबंधक कारवाई न करण्याकरीता २,०००/- रूपयांची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे सापळा कारवाई आयोजित केली असता पंच साक्षीदारांचे समक्ष तक्रारदार यांचेकडुन **आरोपी लोकसेविका रेखा भैरू लोहार, महिला पोलीस हेड कॉन्टेबल ब.नं. ३७०, नेमणुक - गडहिंग्लज पोलीस ठाणे, जि.कोल्हापूर यांनी स्वत:साठी मागणी केलेप्रमाणे २,०००/- रूपये** लाच रक्कम स्विकारलेने त्यांना रंगेहाथ पकडण्यात आले असुन आलोसे यांचेविरूध्द गडहिंग्लज पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरू आहे.

सदरची कारवाई श्री. अमोल तांबे, पोलीस उपआयुक्त/पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे., श्री. विजय चौधरी, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे यांचे मार्गदर्शनानुसार तसेच श्री सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक यांचे मार्गदर्शनाखाली श्रीमती आसमा मुल्ला, पोलीस निरीक्षक, श्री. प्रकाश भंडारे, सहा.फौजदार, पो.हे.कॉ. श्री. अजय चव्हाण, पोहेकॉ/ सुधीर पाटील, मपोकॉ/ पुनम पाटील सर्व ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर यांनी केली आहे.

**सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाचेच्या अथवा अपसंपदेबाबतच्या तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या खालील कंमाकावर संपर्क साधावा.**

**१) मा.महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, म.रा.मुंबई टोल फ्री कमांक :- १८००२२२०२१**
**२) मा.पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र, पुणे दुरध्वनी कमांक :- ०२०/२६१२२१३४, ०२०/२६१३२८०२, ०२०/२६०५०४२३.**
**३) श्री.सरदार नाळे, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कोल्हापूर मो.नं. ९६७३५०६५५५ कार्यालय दुरध्वनी कमांक - ०२३१/२५४०९८९.**
**४) हेल्पलाईन टोल फ्री कमांक:- १०६४.**
**५) व्हॉटस अप कमांक :- ७८७५३३३३३३.**

( सरदार नाळे )
पोलीस उप अधीक्षक
ॲन्टी करप्शन ब्युरो, कोल्हापूर